**स.क्रि.केस नं.२३३/२०२५**

श्री. वारणा विभाग सहकारी ग्राहक मंडळ लि.वि. सचिन बाळासो कणसे

**निशाण नं.८ /क**

**<u>उलटतपास आरोपी तर्फे वकील श्री. पी. के. पाटील यांचेतर्फे शपथेवर सुरु,</u>**

७.माझे शिक्षण बीकॉम ऑनर्स असे झालेले आहे. मी फिर्यादी संस्थेमध्ये सन १९९६ पासून नोकरी करत आहे. सन १९९६ पासून मी सेल्स क्लार्क या पदावर काम करत आहे. सध्या मी पेट्रोल पंप मॅनेजर म्हणून वारणा विभागाचे काम करत आहे. मी फिर्यादी संस्थेच्या वारणानगर शाखेमध्ये १९९६ पासून काम करत आहे. मी १९९६ पासून वारणानगर तसेच इतर शाखांमधील देखील काम केलेले आहे. मी गेली १० वर्षे पेट्रोल पंपावर मॅनेजर म्हणून काम करत आहे.

८. सन १९९६ ते २००१ मी वारणा बाजार अकॉउंट विभागात काम केले त्यानंतर पुढील पाच वर्षे मी वारणा विभाग पेट्रोल पंपावर काम केले आहे. सन २००७ ते सन २०२५ पर्यंत मी तपासणी विभागात काम करत होतो. गेल्या पाच ते सहा महिन्यापासून मी पेट्रोल पंपावर मॅनेजर म्हणून काम पाहत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९६ ते सन २००१ या कालावधीमध्ये सेल्स क्लार्क म्हणून काम पाहिण्याकरिता माझी ऑर्डर होती. सन २००१ ते सन २००७ या कालावधीमध्ये पेट्रोल पंप विभागासाठी मॅनेजर म्हणून माझी ऑर्डर होती. सन २००७ ते सन २०२५ या कालावधीसाठी सेल्स क्लार्क तपासणी विभाग म्हणून माझी ऑर्डर होती. हे म्हणणे खरे आहे की, वारणा विभाग सहकारी ग्राहक मंडळ ही आमची मुख्य शाखा आहे. हे म्हणणे खरे आहे की, वारणा विभाग सहकारी ग्राहक मंडळ यांची स्थापना महाराष्ट्र सहकार सोसायटी कायदा तरतुदीनुसार झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या फिर्यादी संस्थेचे पोट नियम आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या फिर्यादी संस्थेचे कामकाज पोटनियमानुसार चालते. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या

फिर्यादी संस्थेचे दर वर्षी ३० मार्च रोजी ऑडिट होते. आम्ही मुख्य शाखा तसेच उपशाखा यांचे ऑडिट करतो. हे म्हणणे खरे आहे की, मुख्य शाखेचे ऑडिट वेगळे व इतर शाखेचे ऑडिट वेगळे होते. आमच्या मुख्य शाखेचे प्रचलित नाव श्री. वारणा विभाग सहकारी ग्राहक मंडळ वारणानगर म्हणजेच वारणा बझार असे आहे.

**<u>उलटतपास आरोपी तर्फे वकील यांच्या विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकूब</u>**

श्रवणोत्तर स्विकृत ,

सही/-
**(के.दि.काकतकर)**
दिनांक. ११.१२.२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा